# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

**SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY**

**(Formerly University of Pune)**

**Website: www.unipune.ac.in, E-mail Id.:ar.coordination@pun.unipune.ac.in, coe@unipune.ac.in, Phone No.: 020-25621440**


## शुद्धीपत्रक

**परिपत्रक क्र.४४५--/२०२५**

**विषय :** महाविद्यालयांकडे वर्ग करण्यात आलेल्या प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमांच्या (अभियांत्रिकी, औषधनिर्माण व वास्तुशास्त्र वगळून) परीक्षा आयोजनाबाबत.

**संदर्भ :** परिपत्रक क्र.२३०/२०२५, जा.क्र.परीक्षा समन्वय/७३७, दिनांक ११.०९.२०२५

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मधील हिवाळी सत्र परीक्षा २०२५ बाबत उपरोक्त सदर्भ क्र.०१ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर परिपत्रकातील नमूद मुद्दा क्र.०३, ०७, १२ व १३ च्या अनुषंगाने महाविद्यालयांकडे वर्ग करण्यात आलेल्या प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमांच्या (अभियांत्रिकी, औषधनिर्माण व वास्तुशास्त्र वगळून) परीक्षा आयोजनाबाबत अंशतः बदल करण्यात आलेला असून याबाबतची कार्यपद्धती खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | परीक्षा आयोजनातील विविध टप्पे | आयोजन/ कार्यवाही स्तर |
|---|---|---|
| १) | शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मधील नव्याने प्रवेशित नियमित विद्यार्थ्यांच्या प्रथम वर्ष-प्रथम सत्राच्या परीक्षांकरिता पेपर सेटींग व वेळापत्रकाचे कामकाज | विद्यापीठ |
| २) | अनु.क्र. ०१ मध्ये नमूद परीक्षांकरिता केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प केंद्र | संबंधित महाविद्यालय |
| ३) | अनुशेष विद्यार्थ्यांच्या (Backlog Students) प्रथम वर्ष -प्रथम व द्वितीय सत्राच्या, सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षांकरिता पेपर सेटींग, वेळापत्रक, परीक्षा आयोजन व केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प केंद्राचे कामकाज | संबंधित महाविद्यालय |

तसेच परिपत्रक क्र.२३०/२०२५, जा.क्र.परीक्षा समन्वय/७३७, दिनांक ११.०९.२०२५ अन्वये कळविण्यात आलेल्या इतर मार्गदर्शक सूचनांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही, याची सर्व संबंधितांनी, नोंद घ्यावी.

(प्रा.डॉ.प्रभाकर देसाई)
**प्रभारी संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

परीक्ष समन्वय कक्ष, परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जा.क्र.-११८०--, दिनांक : ३.१२.२०२५

**प्रति,**
**मा.प्राचार्य/मा.संचालक, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था**
**पुणे जिल्हा, अहिल्यानगर जिल्हा, नाशिक जिल्हा व दादरा आणि नगर हवेली केंद्रशासित प्रदेश**

**प्रत माहितीसाठीः**
१) मा.प्रभारी अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.
२) उपकुलसचिव, छाननी व तालिनीकरण कक्ष, परीक्षा विभाग.
३) उपकुलसचिव, गोपनीय व बारकोड कक्ष, परीक्षा विभाग.
४) उपकुलसचिव, गोदाम कक्ष, परीक्षा विभाग.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्रमांक : २३०/२०२५**

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील हिवाळी सत्र २०२५ परीक्षा आयोजनाबाबत**

विद्यापीठ अधिकार मंडळांनी वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार सर्व विद्याशाखांतील सर्व अभ्यासक्रमांच्या हिवाळी सत्र २०२५ परीक्षांच्या आयोजनाबाबतची मार्गदर्शक तत्वे व सूचना खालीलप्रमाणे :

१. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील हिवाळी सत्र २०२५ प्रथम वर्षातील (अभियांत्रिकी, औषधनिर्माण व स्थापत्य वगळून) सर्व अभ्यासक्रमांच्या अंतर्गत मूल्यमापन परीक्षांचे आयोजन दि. १३ ते २५ सप्टेंबर, २०२५ या कालावधीत महाविद्यालय/परिसंस्था स्तरावर करावे. अंतर्गत मूल्यमापनाचे गुण भरण्यासाठी स्वतंत्रपणे परिपत्रक व लिंक जाहीर करण्यात येईल.

२. उपरोल्लेखित प्रथम वर्षातील सर्व अभ्यासक्रमांच्या (अभियांत्रिकी, औषधनिर्माण व स्थापत्य वगळून) हिवाळी सत्र २०२५ मधील प्रात्यक्षिक परीक्षांचे आयोजन दि. २६ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत करावे. या प्रथम वर्षातील प्रात्यक्षिक परीक्षांसाठी बहि:स्थ परीक्षक इतर महाविद्यालयातून रीतसर नियुक्त करावेत आणि विद्यापीठ नियमानुसार या प्रात्यक्षिक परीक्षा आयोजित कराव्यात.

३. उपरोल्लेखित प्रथम वर्षातील सर्व अभ्यासक्रमांच्या (अभियांत्रिकी, औषधनिर्माण व स्थापत्य वगळून) सत्रान्त लेखी परीक्षा दि. ४ ते १६ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत घेण्यात येतील. या परीक्षांचे वेळापत्रक पुढील ७ दिवसांत जाहीर करण्यात येईल.

४. दि. ४ ते १७ ऑक्टोबर, २०२५ याच कालावधीत द्वितीय, तृतीय, चतुर्थ व पाचव्या वर्षातील सर्व अभ्यासक्रमांच्या (अभियांत्रिकी, औषधनिर्माण व स्थापत्य वगळून) प्रात्यक्षिक परीक्षांचे आयोजन करण्यात येत आहे. या संदर्भातील प्रात्यक्षिक परीक्षांचे वेळापत्रक, बहि:स्थ परीक्षकांची नेमणूक इत्यादी बाबी ३० सप्टेंबर पूर्वी जाहीर करण्यात येतील.

५. अभियांत्रिकी, औषधनिर्माण व स्थापत्य अभ्यासक्रमाच्या सर्व परीक्षांचे नियोजन व वेळापत्रक स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.

६. दि. २२ नोव्हेंबर, २०२५ पासून द्वितीय, तृतीय, चतुर्थ व पाचव्या वर्षातील हिवाळी सत्र २०२५ सत्रान्त लेखी परीक्षा विद्याशाखानिहाय आयोजित केल्या आहेत. याबाबतचे वेळापत्रकही पुढील ७ दिवसांत जाहीर करण्यात येईल.

७. प्रथम वर्षातील सर्व अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिका विद्यापीठ स्तरावरच तयार करण्यात येतील. सर्व विद्याशाखा आणि सर्व अभ्यासक्रमांतील अभ्यासपत्रिकांच्या प्रश्नपत्रिका निर्मितीची एकत्रित प्रकल्पबैठक दि. १५ ते २५ सप्टेंबर, २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात येत आहे. ह्याबाबतच्या नियुक्त्या प्राप्त होताच प्राश्निक व नियामक ह्यांनी उपस्थित राहणे अनिवार्य राहील.

८. जे अभ्यासक्रम यापूर्वीच्या परिपत्रक क्र. १२५ अंतर्गत संलग्नित झालेले आहेत, त्या अभ्यासक्रमांची परिपत्रक क्र. १२५ अंतर्गतची ओळख संपुष्टात आली असून याबाबतचे परिपत्रकही प्रदर्शित करण्यात आले आहे. या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षातील सर्व परीक्षा या उपरोक्त प्रक्रियेनुसारच (अनुक्रमांक १ ते ३) पार पाडाव्यात. याबाबतचे वेळापत्रकही ७ दिवसांत जाहीर करण्यात येईल. या अभ्यासक्रमांतील सर्व प्रश्नपत्रिकाही दि. १५ ते २५ सप्टेंबर, २०२५ याच कालावधीत तयार करण्यात येतील.

९. परिपत्रक क्र. १२५ अंतर्गत सर्व अभ्यासक्रमांची ऑनलाईन नोंद करण्यासाठीची लिंक महाविद्यालयांना व परिसंस्थांना स्वतंत्र परिपत्रकाद्वारे पुढील २ दिवसांत उपलब्ध करून देण्यात येईल. या लिंकवर अगोदरच्या १२५ अंतर्गत सर्व अभ्यासक्रमनिहाय अभ्यासपत्रिकांची नोंदणी महाविद्यालयामार्फत करणे अनिवार्य आहे. यात कुचराई केल्यास आणि विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास याची सर्व जबाबदारी महाविद्यालय/परिसंस्थेचीच राहील.

१०. ज्या राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्थांचा वा विभागांचा दर्जा परिपत्रक क्रमांक १२५ नुसार ह्यागोदर निर्धारित झाला आहे तो तसाच ठेवला असून त्यांच्या परीक्षा अगोदरच्या पद्धतीनेच आयोजित कराव्यात. (परिपत्रक क्रमांक २२९/२०२५ दिनांक ४.९.२०२५)

११. परिपत्रक क्र. १२५ अंतर्गत २०२५-२६ पूर्वी प्रवेशित सर्व वर्गातील विद्यार्थ्यांच्या दुसऱ्या वर्षापासूनच्या परीक्षा अगोदरच्याच प्रचलनाप्रमाणे त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत महाविद्यालय स्तरावरच आयोजित कराव्यात. याबाबतच्या सर्व प्रकारच्या पूर्वपरवानाग्या अनिवार्य आहेत.

१२. सारांश, सर्व विद्याशाखांतील मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांच्या पदविका परीक्षा तसेच सर्व मान्यताप्राप्त पारंपरिक अभ्यासक्रमांतील (कला, वाणिज्य व विज्ञान) पदवीस्तरावरील प्रथम वर्षांच्या परीक्षा, तसेच विधी अभ्यासक्रम पदवीस्तरावरील प्रथम वर्षाच्या एलएलबी व बीएएलएलबी परीक्षांचे आयोजन महाविद्यालय स्तरावरच करण्यात यावे. मात्र उपरोल्लेखित पदविका व प्रथम वर्ष परीक्षांचे वेळापत्रक तयार करणे, प्रश्नपत्रिका तयार करणे हे कार्य विद्यापीठ स्तरावर होईल आणि प्रत्यक्ष परीक्षांचे आयोजन करणे व उत्तरपत्रिका तपासणे इत्यादी कामे महाविद्यालय स्तरावर पूर्वीप्रमाणेच होतील.

सर्व विद्याशाखांतील पदविका अभ्यासक्रमांच्या परीक्षा तसेच पारंपरिक अभ्यासक्रमातील पदवी स्तरावरील प्रथम वर्षांच्या (कला, वाणिज्य व विज्ञान) अंतर्गत परीक्षांचे गुण, मौखिक परीक्षांचे गुण / प्रात्यक्षिक परीक्षांचे गुण, तसेच लेखी परीक्षांचे गुण अशा सर्व कार्यांचे नियोजन वेळोवेळी स्वतंत्र परिपत्रकाद्वारे कळवण्यात येईल.

पारंपरिक अभ्यासक्रमांतील (कला, वाणिज्य, विज्ञान) पदवीस्तर प्रथम वर्ष, विधी अभ्यासक्रम प्रथमवर्ष वगळून ह्या अभ्यासक्रमांची उर्वरित वर्षे तसेच पदव्युत्तरस्तरातील अभ्यासक्रमांची सर्व वर्षे, तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांची पदवी व पदव्युत्तर स्तरातील सर्व वर्षांच्या अनुरूप सत्रपरीक्षांचे आयोजन विद्यापीठस्तरावरच करण्यात येईल.

१३. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सर्व विद्याशाखांतील मान्यताप्राप्त पदविका, तसेच पारंपरिक अभ्यासक्रमांतील पदवीस्तर प्रथम वर्ष (कला, वाणिज्य, विज्ञान), तसेच विधी अभ्यासक्रम प्रथम वर्ष परीक्षांचे मूल्यमापन करण्यासाठी संबंधित महाविद्यालय हे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम, ४८(१)(च) नुसार केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प केंद्र (कॅप) म्हणून मान्यता देण्यात येत आहे. संबंधित महाविद्यालयाचे/परिसंस्थेचे प्राचार्य/संचालक हे त्या केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प केंद्राचे (कॅप) संचालक म्हणून कामकाज पाहतील.

१४. पारंपरिक मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांतील पदवीस्तर अंतिमपूर्व व अंतिम वर्ष (कला, वाणिज्य व विज्ञान) तसेच विधी अभ्यासक्रमातील एलएलबी पदवीचे अंतिमपूर्व व अंतिम वर्ष आणि बी.ए.एल.एल.बी पदवीचे दुसरे, तिसरे, चौथे व अंतिम वर्ष; पदव्युत्तरस्तरातील अभ्यासक्रमांची सर्व वर्षे, व्यावसायिक अभ्यासक्रमांची (विधी वगळून) पदवी व पदव्युत्तर स्तरातील सर्व वर्षांच्या परीक्षांचे मूल्यमापन **केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प पध्दतीने विद्यापीठस्तरावर** करण्यात येईल. तसेच या अभ्यासक्रमांच्या केंद्रीय मूल्यमापन केंद्रांबाबत परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभागामार्फत स्वंतत्रपणे अवगत करण्यात येईल.

१५.हिवाळी २०२५ सत्रपरीक्षांकरिता महाविद्यालय/परिसंस्थांकडून अनुरूप विविध सत्रांतर्गत गुण स्वीकारण्याच्या प्रणालीमध्ये परीक्षा विभागाद्वारे सुरक्षित व संरक्षित सर्व तपशीलांसह **एक्सेल शीट** उपलब्ध करून देण्यात येतील आणि पुरवण्यात आलेल्या एक्सेल शीटमध्येच अंतर्गत गुणांची नोंद करून सदर एक्सेल शीट विद्यापीठाच्या सुरक्षित व संरक्षित अंतर्गतगुणप्रणालीमध्ये अपलोड करण्यात यावी.

१६.सर्व महाविद्यालये/ परिसंस्थांचे प्राचार्य/संचालक यांनी परीक्षार्थीच्या बैठकव्यवस्थेचे नियोजन काटेकोरपणे व नियमानुसार करावे. तसेच अनुरूप हवा व उजेडासाठी पर्याप्त पंखे व वीजव्यवस्था करण्यात यावी.

१७.महाविद्यालयांमध्ये जर आवश्यक बैठकव्यवस्थेकरिता साधने उपलब्ध नसतील तर संबंधित प्राचार्यांनी तात्पुरत्या व्यवस्थेची सोय करावी. त्यात कुचराई करू नये. विद्यापीठ नियमाप्रमाणे बैठकव्यवस्था करण्याची जबाबदारी संपूर्णपणे महाविद्यालयाचे प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक ह्यांची प्रामुख्याने आणि पर्यायाने परीक्षा अधिकारी यांची राहील.

१८.महाविद्यालयाच्या इमारतीत केवळ वरच्या मजल्यांवर परीक्षा घेण्याची व्यवस्था ठळकपणे लक्षात येत आहे. ह्यामुळे सर्वप्रथम तळमजला व क्रमाने वरील मजले परीक्षेसाठी वापरावेत. अन्यथा ह्याबाबत परीक्षा आयोजनातील दोष मानून कारवाई करण्यात येईल.

१९.परीक्षाकेंद्रावर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विद्यार्थ्यांच्या वस्तू ठेवण्याची व्यवस्था करण्यात यावी. विद्यार्थ्यांनी कोणत्याही परिस्थितीत मोबाईल/ तत्सम उपकरणे परीक्षाकक्षामध्ये आणणे, हे नियमबाहय व आक्षेपार्ह आहे. आपण ह्याबाबत जागृती करावी व खबरदारी घ्यावी. मोबाईल/उपकरणे हरविल्यास/चोरी/ गहाळ झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची असेल ह्यासंदर्भात विद्यार्थ्यांमध्ये जागृती करावी. याबाबत संबंधित परीक्षा अधिकारी यांनी दक्षता घ्यावी. अशा कोणत्याही आढळास महाविद्यालय जबाबदार राहील आणि परीक्षाकेंद्र म्हणून असलेला दर्जा निलंबित होईल.

२०.दिव्यांग विद्यार्थ्यांना शासन निर्णयाप्रमाणे परीक्षाकेंद्रावरच्या सोयी व सवलती देय राहतील. या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी प्रति तास २० मिनिटे अधिकचा वेळ देय राहील. दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता तळमजल्यावर विशेष खोलीची व्यवस्था करण्यात यावी. तसेच आवश्यकतेनुसार त्यांना लेखनिक व इतर सर्व सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. ह्याबाबत प्राचार्य, वरिष्ठ पर्यवेक्षक आणि परीक्षा अधिकारी ह्यांनी आत्यंतिक संवेदनशीलतेने कार्य करावे. ह्यासंदर्भात परीक्षा अर्जात केलेले बदल आणि त्याबाबतची कार्यवाही दक्षतेने करावी.

२१.विद्यार्थ्यांनी परीक्षा सुरु होण्यापूर्वी अर्धा तास अगोदर परीक्षा केंद्रावर हजर राहणे अनिवार्य आहे. याबाबतच्या पूर्वसूचना संबंधित महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना द्याव्यात. प्रश्नपत्रिका विहित वेळेपूर्वी परीक्षा कक्षाबाहेर जाणे बेकायदेशीर असून ह्याबाबत अनुषंगिक परिपत्रकांचे अनुपालन करावे.

२२.सदर परीक्षांदरम्यान कोणत्याही विद्यार्थ्याने गैरप्रकार केल्याचे आढळून आल्यास सदर विद्यार्थी हा विद्यापीठ अध्यादेश क्र. ०९ नुसार कारवाईस पात्र असेल. तसेच वेळोवेळी केंद्रशासन व राज्यशासन यांनी निर्गमित केलेले कायदे **(IT Act 2000, Section 66)** ह्यानुसारही गैरप्रकार करणारे विद्यार्थी कारवाईस पात्र असतील.

२३.इमर्जन्सी बारकोड असाधारण परिस्थितीत आणि पूर्वपरवानगीनेच वापरण्यात यावेत. परीक्षा अर्ज न भरलेल्या विद्यार्थ्यांना इर्मजन्सी बारकोडवरुन परीक्षेस बसविणे हा दखलपात्र गुन्हा असून त्याबाबत संबंधितावर कारवाई होऊ शकते, याची नोंद कृपया घ्यावी. याबाबत संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/ परिसंस्थेचे संचालक तसेच परीक्षा अधिकारी यांनी विशेष दक्षता घ्यावी.

२४.विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार विद्यापीठाच्या नियमित परीक्षा आणि परिपत्रक १०४/२०२२ मध्ये नमूद विद्यापीठेतर संस्थांच्या परीक्षा एकाच दिवशी येत असल्यास, तसेच याशिवाय उपरोक्त परिपत्रकात नमूद क्रमांक १ ते ५ ह्या कारणांकरिताही विशेष परीक्षा आयोजनाची कार्यवाही परिपत्रकानुसार करण्यात येईल. ह्याबाबतचे परीक्षाअर्ज अग्रेषित करण्याची जबाबदारी महाविद्यालयाची असेल.

२५.केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पकेंद्र (कॅप) आयोजनासाठी निवडलेल्या महाविद्यालयाचे प्राचार्य/परिसंस्थांचे संचालक ह्यांनी परीक्षेच्या प्रारंभापासून दुसऱ्याच दिवशी केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प सुरू करावा. याबाबतच्या सूचनावलीचे पत्र स्वतंत्रपणे परीक्षा-छाननी व तालिकीकरण कक्षामार्फत पाठविण्यात येईल.

२६.विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार हिवाळी सत्र २०२५ परीक्षा आयोजनासाठी संबंधित महाविद्यालयास परीक्षा केंद्र म्हणून तात्पुरती मान्यता देण्यात येत आहे. केवळ नवीन महाविद्यालयांनी सादर केलेल्या परीक्षा केंद्राच्या प्रस्तावाबाबत परीक्षा विभागाद्वारे नियुक्त समिती भेट देईल आणि समितीने सादर केलेल्या अहवालावर परीक्षा व मूल्यमापन मंडळाने दिलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

शिवाय अधिकार मंडळांच्या निर्देशानुसार लवकरच सर्व महाविद्यालयांचे परीक्षा नियोजन, मूल्यमापन, पायाभूत सुविधा, पुरेसे मनुष्यबळ तसेच प्राचार्य, परीक्षा अधिकारी, शिक्षक मान्यता, सीसीटीव्ही अनुरूपता आणि सहज उपलब्धता ह्या अनुषंगाने लेखापरीक्षण करण्यांत येणार आहे. आवश्यक बाबी आणि त्यांचे तपशील सप्टेंबर २०२५ पर्यंत प्रत्येक महाविद्यालयास पुरवण्यात येतील. त्यानंतर पूर्ततेसाठी दिलेल्या एका विशिष्ट मुदतीनंतरही ह्यात कमतरता असणाऱ्या महाविद्यालयांचा परीक्षाकेंद्र म्हणून असणारा दर्जा तात्काळ संपुष्टात येईल.

२७.ज्या महाविद्यालयांमध्ये सबळ/सक्षम व स्वीकारार्ह पर्याप्त कारणांमुळे परीक्षा आयोजन करणे शक्य नसेल अशा महाविद्यालयांनी जवळच्या महाविद्यालयात परीक्षा आयोजनाबाबतचा पत्रव्यवहार विनाविलंब परीक्षा विभागाकडे सादर करावा. प्रस्ताव सादर करताना दुस-या महाविद्यालयाचे 'ना-हरकत प्रमाणपत्र' जोडणे अनिवार्य आहे.

२८.भरारी पथक सदस्य /वरिष्ठ बाहय पर्यवेक्षक /स्थायी निरीक्षक ह्या स्वरूपात परीक्षा आयोजनाबाबत परीक्षा विभागाकडून वेळोवेळी जे आदेश प्राप्त होतील, त्या महाविद्यालयीन अध्यापकांनी, अध्यापकेतर कर्मचाऱ्यांनी परीक्षाविषयक आवश्यक ते सहाय्य व सेवा देणे हे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ४८(४) नुसार बंधनकारक आहे. संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी/परिसंस्थेच्या संचालकांनी अशा अध्यापकांना/अध्यापकेतर कर्मचाऱ्यांना विद्यापीठस्तर परीक्षा व विद्यार्थ्यांचे मूल्यमापनविषयक सर्व कामकाजांसाठी नमूद कालावधीकरीता तात्काळ कार्यमुक्त करणे आणि ह्याबाबतच्या नियुक्त्या प्राप्त होताच विनाविलंब त्या त्या सेवेत हजर राहणे अनिवार्य आहे. कोणत्याही महाविद्यालयाने अशा नियुक्तीत परस्पर बदल केला तर ह्याबाबत प्रमादअंतर्गत कारवाई करण्यात येईल.

२९.सदर परीक्षेवेळी संबंधित परीक्षाकेंद्रांना योग्य वेळी ऑनलाईन पद्धतीने प्रश्नपत्रिका प्राप्त झाली नाही, तर परीक्षा अधिकारी ह्यांनी ०२०-२५६२१४५३ या दूरध्वनी क्रमांकावर तात्काळ संपर्क साधावा. प्रश्नपत्रिकेबाबत आपल्याच स्तरावर परस्पर कार्यवाही करणाऱ्या आणि नियमोलंघन करणाऱ्या महाविद्यालयावर परीक्षा केंद्र निलंबनाची कारवाई करण्यात येईल.

३०.महाविद्यालय प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक, परीक्षा अधिकारी ह्यांनी आपले मोबाईल क्रमांक परीक्षा कामकाजाकरिता अद्ययावत करावेत. हे संपर्क क्रमांक सतत संपर्कयोग्य असावेत. तसेच परीक्षा अधिकारी यांची नेमणूक दिनांक २० सप्टेंबर, २०२५ पूर्वी केलेली असावी.

३१.जर संबंधित परीक्षाकेंद्रांना परीक्षा आयोजन करण्यासाठी उत्तरपत्रिका व इतर आवश्यक साधनसामुग्री प्राप्त झाली नाही तर त्यांनी ०२०-२५६२१४६०, २५६२१४६२ या क्रमांकावर संपर्क साधून परीक्षा गोदाम कक्षातून आवश्यक साधनसामुग्री घेऊन जाण्याची व्यवस्था करावी.

३२.विद्यापीठ अधिकार मंडळांच्या निर्णयानुसार (सुधारित अध्यादेश क्र. १८४ 'अ' व 'ब') हिवाळी सत्र, २०२५ परीक्षांसाठी छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकनाची सुविधा लागू राहील.

३३.पारंपरिक अभ्यासक्रमांच्या पदवीस्तर प्रथम वर्ष (कला, वाणिज्य, विज्ञान व विधी) परीक्षांचे आयोजन करताना विद्यापीठाच्या उत्तरपत्रिकांचा वापर करू नये, पण स्वतःची स्टेशनरी व उत्तरपत्रिका वापरताना याबाबतीत आवश्यक ती सर्व गोपनियता व सुरक्षिततेची दक्षता घेण्यात यावी.

३४.त्या त्या श्रेयांकानुसार उत्तरपत्रिका किती पानी वापरायची ह्याबाबत स्वतंत्र परिपत्रकाद्वारे कळवण्यात येईल.

३५.संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/मान्यताप्राप्त परिसंस्थेचे संचालक तसेच परीक्षा अधिकारी ह्या सर्वांनीच उपरोक्त मार्गदर्शक तत्वे व सूचनांचे अवलोकन करुन याबाबत आपल्या महाविद्यालयातील/ परिसंस्थेतील सर्व अध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, अधिकारी व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरुन सूचित करावे आणि त्यांच्या शंकांचे निरसन करुन विद्यापीठास सहकार्य करावे.



प्रा.(डॉ.) प्रभाकर देसाई
प्रभारी संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ: परीक्षा-समन्वय/७३७
दिनांकः- ११.०९.२०२५

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था
पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हा आणि सिल्वासा

**SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY, PUNE**

**EXAMINATION COORDINATION SECTION**

**WINTER SEMESTER EXAMINATION SCHEDULE 2025**

| Sr. No. | Name of the Program | Year | Pattern | IE/Continuous Internal Evaluation(CIE) | | External Evaluation (EE) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **Practical/Viva-Voce/Theory etc.** | **Conduction Level** | **Practical/Viva-Voce etc.** | **Theory** | **Conduction Level** |
| 1. | All **U.G.** Program (Except-Engineering, Pharmacy and Architecture) | I | All | 13/09/2025 to 25/09/2025 | College | 26/09/2025 to 03/10/2025 | 04/10/2025 to 16/10/2025 | University |
| 2. | All **U.G.** Program (Except-Engineering, Pharmacy and Architecture) | II /III and IV/V (Integrated Courses) | All | 13/09/2025 to 25/09/2025 | College | 04/10/2025 to 17/10/2025 | 22/11/2025 onwards | University |
| 3. | Other than above program | As per tentative Exam schedule declared in academic calendar | | | | | | |

**Prof. (Dr.) Prabhakar Desai**
**Officiating Director**
**Board of Examinations and Evaluation**